महाराष्ट्र शासन

# छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रुग्णालय, कोल्हापूर

शेंडा पार्क कोल्हापूर - ४१६०१३

दुरध्वनी -: 0231 - 2641583 | फॅक्स क्र. 0231 -2644369 | Email - est12cprh@gmail.com

जा.क्र.छप्रासरुको/ आस्था-१-२/रिक्तपदे/ 3190 /२०२६ दिनांक - 20 /०५/२०२६

## थेट मुलाखत

विषय :- छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रुग्णालय, कोल्हापूर येथील स्थानिक निवड समितीमार्फत (डि.एस.बी.) तात्पुरत्या स्वरुपात ३६४ दिवसांकरिता दंतशल्यचिकित्सक गट -ब (परावर्तीत पदे) थेट मुलाखतीव्दारे भरण्याबाबत.

संदर्भ:- १) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मुंबई यांचेकडील शा. नि. क्र.एमईडीडी -५०२३(१)/८४/ २०२५-एमएमडी (वैसेवा-४)/११९९३९५, दि. ०९.०७.२०२५

२) मा. अधिष्ठाता, छप्रासरुको, यांचेकडील दि. /०५/२०२६ रोजीची मंजूर टिप्पणी.

संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्या अधिपत्याखालील छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रुग्णालय, कोल्हापूर या आस्थापनेवरील रिक्त होणा-या दंतशल्यचिकित्सक गट ब (रुपांतरीत पद) या पदी नियुक्तीसाठी संदर्भ क्र.१ चा शासन निर्णय व संदर्भ क्र.२ च्या मंजूर टिप्पणीनुसार थेट मुलाखतीसाठी अर्ज मागविण्यात येत आहेत. थेट मुलाखत अधिष्ठाता कार्यालय, शेंडा पार्क येथे दि. ०७/०६/२०२६रोजी सकाळी/दुपारी 3·30 वाजता घेण्यात येतील.

तरी इच्छूक उमेदवारांनी आपली मूळ शैक्षणिक कागदपत्रे व साक्षांकित प्रतीसह स्वखर्चाने उपस्थित रहावे. सदर पदे भरण्याबाबतचे अटी व नियम प्रचलित शासन निर्णयानुसार राहतील. अर्ज सादर करण्याचा कालावधी दि.२०/५/२६ ते दि.२५/५/२६ कार्यालयीन वेळेत. (सुट्टीचे दिवस वगळून)

| Sr.No. | Subject | Qualification | No. of Post | Institute Name |
|---|---|---|---|---|
| 01 | Dentist | Bachler of Dental Surgery (As Per D.C.I. Norms) | 01 | C.P.R. Hospital, Kolhapur |

या जाहिरातीमधील अटी, शर्ती, नियम, पदसंख्या इत्यादीमध्ये बदल करण्याचे तसेच सदरची पदभरती कोणत्याही स्तरावर असताना रद्द करण्याचे अधिकार अधिष्ठाता यांनी स्वत:कडे राखून ठेवले आहेत. जाहिरातीतील रिक्त पदांसाठी मुलाखती घेण्यात येत असून रिक्त पदांच्या उपलब्धतेप्रमाणे प्रथम निवड केलेल्या उमेदवारांना नियुक्तीचे आदेश ३६४ दिवसांकरीता देण्यात येतील. उमेदवारांची कागदपत्रे परिपूर्ण नसल्यास अर्जाचा विचार केला जाणार नाही.

## नियम व अटी

१. वेतनश्रेणी :- वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभागाकडील शा.नि.क्र. एमईडी-२९१९/प्र.क्र.२६२/वैसेवा-३, दि. ३१.१२.२०२० अन्वये दंतशल्यचिकित्सक यांना रु. ७५,०००/- (अक्षरी रुपये पंचाहत्तर हजार फक्त) इतके ठोक मानधन दरमहा अनुज्ञेय राहिल. सदरील वेतन संस्थेत मंजूर असलेल्या मुळ अनुदानातून १० कंत्राटी सेवा या उददीष्ठांमधून भागविण्यात येईल.

२. वयोमर्यादा :- सेवाप्रवेश नियमानुसार वयोमर्यादा खुल्या प्रवर्गाकरिता ३८ वर्ष व मागास प्रवर्गाकरिता ४३ वर्ष राहिल. उमेदवार मागास प्रवर्गात असेल तर जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहिल.

३. शासकीय संस्थेमध्ये दंतशल्यचिकित्सक पदाचा अनुभव असलेल्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.

४. सदरील दंतशल्यचिकित्सक गट ब ची दोन्ही पदे वैद्यकीय अधिकारी गट ब या पदाची परावर्तीत पदे असल्याने सदरची पदे शासनाची मान्यता असे पर्यतच कार्यरत राहतील. त्यानंतर सदरची पदे वैद्यकीय अधिकारी गट ब मध्ये समाविष्ट होतील त्यावेळी आपोआपच संबंधीत उमेदवारांची सेवा समाप्त होईल.

५. निवड करण्यात आलेला उमेदवार कार्यरत असताना सतत जास्त कालावधीत विनापरवानगी गैरहजर असल्यास किंवा काम समाधानकारक नसल्यास त्यांची कंत्राटी नियुक्ती कोणतीही पूर्व सुचना न देता समाप्त करण्यात येईल.

६. मुलाखतीस उपस्थित राहण्याकरिता कोणत्याही प्रकारचा प्रवास व दैनंदिन भत्ता अनुज्ञेय राहणार नाही. तसेच मुलाखतीस उपस्थित राहण्याकरिता या कार्यालयामार्फत कोणताही पत्रव्यवहार करण्यात येणार नाही.

७. अर्जदाराने त्यांच्या निवडीसाठी समितीवर प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल.

८. सदर नियुक्ती ही अत्यंत तात्पुरत्या स्वरुपाची असल्याने आपणास या पदावर कायम स्वरुपाचे कोणतेही हक्क राहणार नाहीत तसेच कायम नियुक्तीचे कोणतेही फायदे अनुज्ञेय नसतील.

९. संस्थेत तात्पुरत्या सेवेत कार्यरत असलेल्या उमेदवारांनी आपले अर्ज विभाग प्रमुखांमार्फत सादर करण्यात यावेत. तसेच या संस्थेव्यतिरिक्त अन्य संस्थेत कार्यरत असलेल्या उमेदवारांनी अर्ज संस्था प्रमुखांमार्फत सादर करावेत.

१०. अर्जासोबत खालील प्रमाणपत्राच्या छायांकित प्रती साक्षांकित करुन जोडणे आवश्यक आहे. अन्यथा अर्जाचा विचार केला जाणार नाही. तसेच मुलाखतीवेळी सर्व मूळ कागदपत्रे सादर करणे आवश्यक राहील. तसेच नियुक्ती झालेस पोलीस व्हेरिफीकेशन व वैद्यकीय तपासणी अहवाल सादर करणे आवश्यक राहिल.

११. आवश्यक कागदपत्रे - १) बी.डी.एस. परिक्षेची गुणपत्रिका २) सर्व पदवी, पदवीका व पदव्युत्तर पदवी परीक्षेची डिग्री प्रमाणपत्रे व अंतिम वर्षाची गुणपत्रीका ३) एन.एम.सी. तसेच एम.सी.आय. अथवा डी.सी.आय. कडे नोंदणी झाल्याचे प्रमाणपत्र. ४) जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र (लागू असल्यास) ५) जन्म दाखला/शाळा/महाविद्यालय सोडल्याचा दाखला ६)पॅन कार्ड व आधार कार्डची छायाप्रत ७) एम.एस.सी.आय.टी. संगणक परिक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र इ.

अधिष्ठाता
छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रुग्णालय,
कोल्हापूर

प्रति,
अध्यक्ष,
संकेतस्थळ विकसक,
छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रुग्णालय, कोल्हापूर